जनसंपर्क कक्ष
02 JUN 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञानाचा वापर समाजासाठी करा : डॉ. गुरव

**वारणानगर : प्रतिनिधी**

इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर समाजविकासासाठी करावा. स्वतःमधील चांगले गुण शोधा व स्वतःचे विश्लेषण करा, ज्ञान मिळवा व वेळेचा योग्य वापर करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या कॉमर्स अ‍ॅन्ड मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.



मानसी मुळीक हिचा गौरव करताना डॉ. ए. एम. गुरव. सोबत अन्य.

तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (ऑटोनॉमास) अभियांत्रिकी महाविद्यालयात गुणगौरव समारंभात ते बोलत होते. वारणा समूहाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले, तर शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर यांनी ४० वर्षांतील महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

या वर्षीची बेस्ट आऊट गोईंग स्टुडंट मानसी मुळीक हिला गौरविण्यात आले, तर क्रीडा विभागातील मानाची जनरल चॅम्पिनशिपम मेकॅनिकल विभागाने मिळवली. समन्वयक डॉ. के. आय. पाटील प्रास्ताविक यांनी केले. प्रा. एस. ए. देसाई यांनी आभार मानले. यावेळी बकस कुरणे, विश्वजित सरनाईक, वैष्णवी आडनाईक उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात तंबाखू विरोधी दिन साजरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने बुधवारी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा करण्यात आला. यावेळी तंबाखू मुक्तीची शपथ घेण्यात आली. सहायक प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी स्वागत केले. यावेळी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, सहायक कुलसचिव पी. एस. शिरोळे, कक्ष अधिकारी एन. पी. साळोखे, सहायक कुलसचिव यू. जी. करवडे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील, सांगली विभागीय केंद्र समन्वयक डॉ. एस. व्ही. माने, ऑफिस सुपरवायझर व्ही. व्ही. वरुटे उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ पदवी अभ्यासक्रम परीक्षेला २७ हजार विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेअंतर्गत गुरुवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी संलग्न महाविद्यालयातील सुमारे २७ हजार ७७२ विद्यार्थी बसले होते. विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा २५ मेपासून सुरू झाल्या आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ सायन्स (फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट), बॅचलर ऑफ व्होकेशन, बॅचलर ऑफ सायन्स (शुगर टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ डिझाईन या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या आहेत. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून १३ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

02 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून 'पेपरफुटी'ची चौकशी सुरू

## अहवाल, सीसीटीव्ही फुटेज मागविले; परीक्षा प्रमाद समिती घेणार माहिती

**कोल्हापूर, ता. १ :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी परीक्षेत आज बी. कॉम. अभ्यासक्रमातील ॲडव्हान्स अकाउंटन्सी पेपर क्रमांक चार फुटल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या निदर्शनास आले. या प्रकरणाची विद्यापीठाकडून चौकशीची प्रक्रिया आजपासून सुरू झाली. या अंतर्गत परीक्षा मंडळाने संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून अहवाल आणि एसआरपीडी कक्षातील सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली. या पेपर फुटीच्या प्रकरणाची चौकशी परीक्षा प्रमाद समिति करणार आहे.



ॲडव्हान्स अकाउंटन्सी विषयाचा पेपर फुटल्याचे लक्षात आल्यानंतर परीक्षा मंडळाने तातडीने प्रश्नपत्रिका बदलून परीक्षा घेतली. या पेपरफुटी झाल्याचा संशय ज्या महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर आहे, तेथील सीसीटीव्ही फुटेज आणि त्याबाबतचा अहवाल लवकर सादर करण्याची सूचना संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना केली आहे. त्यांच्याकडून अहवाल आणि फुटेज प्राप्त झाल्यावर ते पाहून त्यावरील परीक्षा मंडळाची निरीक्षणे नोंदवून अहवाल परीक्षा प्रमाद समितीकडे पाठविण्यात येईल.

त्याबाबतची कार्यवाही दोन दिवसांत पूर्ण केली जाईल. त्यानंतर परीक्षा प्रमाद समितीकडून सविस्तरपणे चौकशी करण्यात येईल, असे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

### 'कॉपी' करणाऱ्या १० विद्यार्थ्यांना पकडले

- बी. एस्सी., कॉम्प्युटर सायन्स, एज्युकेशन, फूड टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंट अशा विविध २१ पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा गुरुवारी झाल्या. त्यासाठी १२ हजार ३०४ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या कालावधीत भरारी पथकाने १० विद्यार्थ्यांना कॉपी करताना पकडले. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील सात आणि सातारा जिल्ह्यातील तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

सकाळ

# मल्ल अक्षय मंगवडेस खेलो इंडियात रौप्य




कोल्हापूर, ता. १ : राष्ट्रकुल कुस्ती संकुलमधील पैलवान अक्षय मंगवडे याने 'खेलो इंडिया' विद्यापीठ स्पर्धेत कुस्तीमध्ये रौप्य पदक पटकावले. वाराणसी (उत्तर प्रदेश) येथील काशी हिंदू विश्वविद्यालयात स्पर्धा झाली.

त्याने प्रथम फेरीत भीषण चौधरीला १०-०, तर दुसऱ्या फेरीत नागपूर विद्यापीठाच्या रोहितला १०-० ने पराभूत केले. उपांत्य फेरीत पंजाब विद्यापीठाच्या गौरव सिंगला त्याने १०-० ने हरवत अंतिम फेरीत प्रवेश केला. हरियाना विद्यापीठाच्या प्रशांत कुमारविरुद्धच्या लढतीत तो एक गुणाने हरला. त्याला राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते राम सारंग यांचे मार्गदर्शन आहे.